REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# प्रचलित परीक्षा पध्दती, त्यातील समस्या व उपाययोजना

डॉ. तांबे शशिकांत लक्ष्मण
एम.ए.,एम.एड्.,एम.फिल.,पीएच.डी.
प्र.प्राचार्य, जय जगदंबा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वैराग.



विद्यार्थ्यांचा सर्वागिण विकास ही अखंडपणे विकास करणे हे शिक्षणाचे प्रमुख ध्येय मानल्यानंतर या ध्येयाप्रत जाण्यासाठी शिक्षण ही अखंडपणे, सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत अध्ययन—अध्यापन आणि मूल्यमापन या प्रमुख क्रिया असून शिक्षकांनी केलेल्या अध्यापनानुसार विद्यार्थ्यांनी किती प्रमाणात अध्ययन केले आहे, याचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी परीक्षा हे एक प्रभावी असे मूल्यमापन साधन आहे. आजकालचा शिक्षण घेणारा विद्यार्थी केवळ परीक्षा पास करणे हेच शिक्षणाचे ध्येय मानू लागलेला आहे. त्यामुळे परिक्षेत येणाऱ्या संभाव्य प्रश्नांची उत्तरे पाठांतर करून तो उत्तरपत्रिका लिहण्याचा प्रयत्न करतो आणि कसातरी परीक्षा पास होतो. त्याचा अभ्यासही परीक्षेच्या दृष्टीनेच होतो. अध्यापकही आपले अध्यापन परीक्षेच्या दृष्टीनेच करतात. त्यामुळे अध्ययन अध्यापनातील उणीवा त्यांना कळू शकत नाही. प्रचलित परीक्षा पध्दतीमध्ये अनेक प्रश्न, समस्या पाहणे महत्वाचे आहे. संपूर्ण पध्दतीत अमूलाग्र बदल घडून येईल आणि शिक्षणाचा नवा दृष्टिकोन निर्माण होवू शकेल आणि नंतरच मग खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या ज्ञानाचे, प्रगतीचे कौशल्याचे योग्य तेच माप त्यांच्या पदरी पडेल.

### ❖ प्रचलित परीक्षा अस्त्वात येण्याची कारणे :—

१) विद्यार्थ्यांनी ज्ञानसंपादन किती प्रमाणात केलेले आहे.

२) विद्यार्थ्यांची प्रगती किती झालेली आहे.

३) प्राविण्य क्षमता, कौशल्य कितपत आत्मसात केलेली आहेत.

४) शिक्षकांनी काय शिकवणे व कसे शिकविले आहे. त्यापैकी विद्यार्थ्यांनी ग्रहण किती केलेले आहे व प्रगती किती झालेली आहे.

५) प्रगती समाधानकारक आहे किंवा नाही.

६) विविध उदिदष्टांची साध्यता झाली की नाही ते आजमावण्यासाठी प्रचलित परीक्षा पध्दती अस्त्वित आल्या.

### प्रचलित परीक्षा ऐतिहासिक पार्श्वभुमी :—

प्राचीन काळी अध्ययन —अध्यापन प्रक्रिया चालू होतीच आणि विद्यार्थ्यांनी अध्ययन कितपत केलेले आहे. हे पाहण्यासाठी त्या काळीही परिक्षा होत्या पण त्यावेळच्या परीक्षा या हल्लीसारख्या लेखी स्वरूपात नव्हत्या कारण लेखन कला ही फारशी अवगत नव्हती.

➢ बहुतांश परीक्षा या तोंडी किंवा मौखीक स्वरूपाच्या होत्या व प्रसंगी प्रात्यक्षिक स्वरूपाच्याही होत्या.

➢ भारतामध्ये इ.स. पूर्व ४०० मध्ये 'सुकरात' यांनी विद्यार्थ्यांची प्रगती पाहण्यासाठी तोंडी परीक्षा उपयोगात आणली.

- इ.स. १२१९ मध्ये बोलोगना विद्यापीठ आणि १३ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत पॅरीस विद्यापीठातसुध्दा विद्यार्थ्यांची तोंडी परीक्षा घेतली जात होती.
- १७२० मध्ये इंग्लंडमध्ये केंब्रिज विद्यापीठात प्रथम लेखी परीक्षा घेतली.
- १८४५ मध्ये होरेसन यांनी बऱ्याच प्रश्नांचा समावेश असणारी अशी प्रश्नावली देवून परीक्षा घेतली.

१८६५ ते १८७८ च्या दरम्यान न्युयॉर्क येथेही लेखी परीक्षा होऊ लागल्या.

- १९०० मध्ये निबंधात्मक परीक्षा योजना अस्तिवात आल्या.
- स्कैटस यांनी परीक्षा सुधारणेचा कालखंड पुढील प्रमाणे दिला.

१) १८९७ ते १९१० — तोंडी परीक्षा
२) १९१० ते १९२० — तोंडी परीक्षा व लेखी परीक्षा
३) १९२० ते १९३० — लेखी परीक्षा — निबंधात्मक प्रश्नांचा समावेश
४) १९३० ते १९४० — लेखी परीक्षा — निबंधात्मक आणि लघुत्तरी, वस्तुनिष्ठ प्रश्नांचा समावेश
५) १९४० ते १९५० — लेखी परीक्षा — मूल्यमापन आणि मापन
६) १९५० ते १९६० — लेखी परीक्षा — मूल्यमापनाची आधुनिक संकल्पना
७) १९६० ते १९८० — आधुनिक मूल्यमापन — वस्तुनिष्ठ प्रश्नावर भर

### प्रचलित परीक्षातील गुण दोष/समस्या :—

#### गुण :—

१) चांगल्या परीक्षांमधून विद्यार्थ्यांचे योग्य मूल्यमापन करता येते.
२) लेखी परीक्षांमधून विद्यार्थ्यांची विविध कौशल्य विकासास वाव मिळतो.
३) तोंडी परीक्षेमधून भाषिक कौशल्ये समजून येत असल्याने विद्यार्थ्यांच्या विकासाचा स्तर लक्षात येण्यास मदत होते.
४) प्रात्यक्षिक परीक्षामधून कृती, क्रिया कौशल्ये समजून येत असल्याने कौशल्याचे, कार्यपघ्दतीचे,कृतींचे मूल्यमापन करता येते.
५) परीक्षा ही एक स्पर्धा असल्यामुळे या स्पर्धेत उत्तीर्ण होण्यासाठी प्रयत्न करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळते.
६) योग्य मार्गदर्शन करता येते, प्रोत्साहनही देता येते.
७) भावी जीवनातील विविध क्षेत्रांत पदार्पण करण्याची संधी मिळते.
८) अध्ययन—अध्यापन आणि मूल्यमापन यांची परस्पर सांगड घलता येते.

- **प्रचलित परीक्षातील दोष/समस्या :—**

१) संपूर्ण परीक्षा पध्दती ही पुस्तकावर आधारलेली आहे.
२) विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेले संपूर्ण ज्ञान तपासले जात नाही.
३) तर्क,अनुमान, कौशल्य, उपयोजन, विश्लेषण, पृथ:करण अभिरूची विकसीत झालेली आहेत, यांचा अंदाज येऊ शकत नाही.
४) लेखी परीक्षेलाच अधिक प्राध्यान्य असल्यामुळै इतर कौशल्यांची तपासणी होत नाही उदा. वाचन, भाषण, उच्चार व कृती कौशल्य.
५) व्यक्तीमत्वाच्या विविध पैलूंचे परिक्षण सध्याच्या परीक्षेमधून होत नाही
६) वार्षिक व लेखी परीक्षेतील यशावरच विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहिली जाते.
७) शिक्षकांचे अध्यापन परीक्षाकेंद्री असते.
८) विद्यार्थीही परीक्षाकेंद्रीच बनतो.
९) अध्ययन—अध्यापन आणि मूल्यमापन यांची योग्य सांगड आढळत नाही.

- **प्रचलित परीक्षातील दोष/समस्या निराकरणाचे मार्ग :—**

प्रचलित परीक्षेमध्ये असलेले दोष दूर करण्यासाठी अनेक मार्गाचा अवलंब करणे.
१) निरंतर अंतर्गत मूल्यमापनाची योजना प्रभावीपणे अंमलात आणावी.
२) विकासात्मक आणि अंतर्गत मूल्यमापन योजना या मार्गाचा अवलंब करावा.
३) विविध मूल्यमापन प्रकारांचा वापर करावा. प्रारंभिक मूल्यमापन, विकासात्मक मूल्यमापन, नैदानिक मूल्यमापन अंतिम मूल्यमापन इ.
४) विविध मूल्यमापन चाचण्यांचा वापर करावा. उदा. प्राविण्य चाचणी, बौद्धीक चाचणी, मानसीक चाचणी, अभिवृत्ती चाचणी, दृष्टीकोन चाचणी अभिरूची चाचणी, कृती कसोटी, व्यक्तीमत्व चाचणी, प्रमाणके संदर्भ, निकषसंदर्भ चाचणी इ.
५) विविध मूल्यमापन साधनांचा वापर करावा —
उदा.घटक चाचण्या, स्वाध्याय, सत्रांत परीक्षा, तोंडी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक परीक्षा, निरीक्षण सूची, पडताळा सूची, पदनिश्चयन श्रेणी, प्रासंगिक नोंदी, संकलित नोंदी मुलाखती प्रश्नावली, मतावली, समाजमिती इ.
६) विविध मूल्यमापन दृष्टिकोनांचा वापर करावा —
उदा. विद्यार्थ्यांच्या स्वयंमूल्यमापन दृष्टकोन, शिक्षक मूल्यमापन दृष्टीकोन, पालक मूल्यमापन दृष्टीकोन, संस्थांतर्गत मूल्यमापन दृष्टीकोन इ.
७) मूल्यापनातील नवीन प्रवाहांचा वापर करावा.
उदा — प्रश्न पेढी, श्रेणी पध्दती, श्रेयांक पध्दती, ऑनलाईन परीक्षा, खुले पुस्तक परीक्षा, मागणीनुसार परीक्षा.
८) आधुनिक विचार प्रवाहाचां मूल्यमापनामध्ये उपयोग करावा.
९) प्रचलित परीक्षेतील दोष दूर करण्यासाठी मार्गदर्शन व समुपदेशनाचा उपयोग करावा.
१०) विद्यार्थ्यांनी वर्षभरामध्ये आत्मसात केलेले ज्ञान सातत्यापूर्ण तपासले जावे.
११)लेखी परीक्षांनाच महत्व देण्यापेक्षा तोंडी परिक्षा, निरीक्षण, मुलाखती यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासाचा विचार करावा.

**संदर्भग्रंथ :—**

१) शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र — प्रा. सुनिल देसले व डॉ. एम. ए. भदाणे, रेश्माई पब्लिकेशन, नाशिक, ऑगस्ट २००९
२) शैक्षणिक मूल्यमापन — डॉ. चा.प. कदम प्रा. बा. आ. चौधरी, नित्यनूतन प्रकाशन, पुणे सप्टेंबर २००९
३) शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र — वा. ना. दांडेकर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे २००७